# नाशिक जिल्हाधिकारी, छत्रपती शाहु महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था सारथी, पुणे व महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था महाज्योती, नागपुर आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने

## मातोश्री वसतिगृहातील रिक्त जागांसाठी अर्ज मागविण्यात येत आहे.

## जाहिरात :- २०२५-२६

शासन निर्णय क्रमांक: वसति ५३१७/प्र.क्र.९/मशि-२ दिनांक १८ ऑक्टोबर, २०२२ अन्वये मातोश्री मुलींचे शासकीय वसतिगृह, सरस्वती नगर, धात्रक फाटा, पंचवटी, नाशिक येथे छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था सारथी, पुणे यामार्फत मराठा, कुणबी, मराठा- कुणबी व कुणबी-मराठा लक्षीत गटातील ७५ मुलींसाठी व महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपुर मार्फत इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या गटातील ७५ मुलींसाठी तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग मार्फत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील ५० मुलींसाठी अशा प्रकारे लक्षित घटकातील एकूण २०० मुलींसाठी वसतिगृह सुरू करण्यात आलेले आहे. त्यानुसार सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात महाज्योतीमार्फत मातोश्री वसतिगृहातील एकूण ७५ जागांपैकी रिक्त १३ जागांकरिता विद्यार्थिनींकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

मातोश्री वसतिगृहातील महाज्योती मार्फत विद्यार्थिनींसाठी एकूण ७५ जागांपैकी रिक्त एकूण १३ जागांचा तपशील खालील प्रमाणे :-

| अ.क्र | प्रवर्ग | टक्केवारी | जागा | रूजु झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या | रिक्त जागा |
|---|---|---|---|---|---|
| १ | इतर मागास वर्ग | ५९% | ४४ | ३९ | ५ |
| २ | विमुक्त जाती | १०% | ७ | ७ | ० |
| ३ | भटक्या जमाती - ब | ८% | ६ | ३ | ३ |
| ४ | भटक्या जमाती - क | ११% | ८ | ६ | २ |
| ५ | भटक्या जमाती - ड | ६% | ५ | ४ | १ |
| ६ | विशेष मागस प्रवर्ग | १००% | ५ | ३ | २ |
| | | | | **६२** | **१३** |

वरील दर्शविल्याप्रमाणे रिक्त जागांमधील संबंधित प्रवर्गातील विद्यार्थिनींनी दि.२३/०७/२०२५ ते दि.१०/०८/२०२५ या कालावधीत मातोश्री वसतिगृहाच्या लाभ घेण्याकरिता अर्ज करावे.

- **महाज्योती संस्थेच्या निकष, अटी व शर्ती खालीलप्रमाणे :-**

१. महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थिनींना प्रवेश घेतल्यानंतर लगेच त्याच वेळेस वसतिगृहात प्रवेश निश्चित करणे आवश्यक राहील. तसेच महाविद्यालय सुरु झाल्यानंतर त्याच वेळेस वसतिगृहात राहण्यास सुरुवात करणे आवश्यक राहील.

२. सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये भविष्यात काही त्रुटी/अडचणी उद्भवल्यास अश्या विद्यार्थिनींचा प्रवेश रद्द करण्यात येईल.

३. वसतिगृहात प्रवेश घेतेवेळी अद्यावत (Valid/Recent) वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.

४. पात्र विद्यार्थिनींना व त्यांच्या पालकांना वसतिगृहाकडून निर्गमीत करण्यात येणारे हमीपत्र हे लेखी स्वरुपात भरून देणे बंधनकारक आहे. तसेच महाज्योती व्यवस्थापनाकडून वेळोवेळी ठरविलेल्या व प्रसिद्ध केलेल्या अटी शर्ती चे पालन करणे हे विद्यार्थिनींना बंधनकारक राहील.

५. वसतिगृह प्रवेशाच्या अनुषंगाने वेळोवेळी आवश्यक बदल करण्याचा अधिकार हा संबंधित विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांचा असेल व तो अर्जदार विद्यार्थीनींना बंधनकारक राहील.

६. अर्जदार विद्यार्थीनी ह्या महाराष्ट्रातील इतर मागासवर्गीय (OBC), विमुक्त जाती (VJ), भटक्या जमाती (NT) आणि विशेष मागास वर्ग (SBC) या प्रवर्गातील नॉन क्रिमिलेयर गटातील असाव्यात.

७. प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या (अपवाद पदविका अभ्यासक्रमानंतर थेट पदवीकरिता द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थीनी) विद्यार्थीनींनीच अर्ज करावे व फक्त त्यांचेच अर्ज विचारात घेतले जातील.

८. वसतिगृहात लाभ घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थीनींनी शासनाच्या इतर वसतिगृहाच्या योजनेचा दुहेरी आर्थिक लाभ घेतलेला नसावा.

९. वसतिगृह प्रवेशाकरिता अर्ज करणाऱ्या विद्यार्थीनी ह्या नाशिक म.न.पा. हद्दीपासून किमान ५ कि.मी. परिसराच्या बाहेरील रहिवास असणाऱ्या असाव्यात.

१०. पूर्णवेळ /अर्धवेळ नोकरीवर असलेल्या विद्यार्थीनीस प्रवेश देण्यात येणार नाही.

११. विद्यार्थीनी नापास झाल्यास/परीक्षेस न बसल्यास या अनुषंगाने पुढील वर्षाकरिता महाविद्यालयात प्रवेशित न झाल्यास, वसतिगृहातील प्रवेश आपोआप रद्द होईल.

१२. प्रवेश अर्जातील माहिती व सादर केलेली प्रमाणपत्रे खोटी असल्याचे आढळल्यास प्रवेश रद्द होईल. संबंधित विद्यार्थीनीवर झालेला खर्च विद्यार्थीनी/पालकांकडून वसूल करण्यात येईल.

१३. अर्जदार विद्यार्थीनींनी सादर करावयाची आवश्यक कागदपत्रे खालीलप्रमाणे -

- मागील परीक्षा उत्तीर्ण झालेल्या शैक्षणिक अहर्तेचे गुणपत्रक
- जातीचा दाखला
- नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र (अद्यावत)
- रहिवासी प्रमाणपत्र/Domicile Certificate
- शाळा सोडल्याचा दाखला
- आधारकार्ड
- राशनकार्ड/मतदान ओळखपत्र
- उत्पन्नाचा दाखला (तहसिलदार यांचा)
- बोनाफाईड (मूळ प्रत)
- फोटो (३) पासपोर्ट साईज
- वसतिगृह करारनामा (महाज्योती संस्थेमार्फत उपलब्ध करुन देण्यात येणारा) सदर करारनामा हा वसतिगृहात प्रवेश घेतेवेळी सादर करणे अनिवार्य राहील.
- गॅप सर्टीफिकेट (असल्यास)
- सक्षम प्राधिकाऱ्याचा वैद्यकीय दाखला
- बँक पासबुक (राष्ट्रीयकृत बँक)

टीप - आवश्यकतेनुसार अन्य कागदपत्रांची मागणी केल्यास विद्यार्थीनीस सादर करणे बंधनकारक राहील.

उपरोक्त प्रवेशाच्या जागा व धोरणांमध्ये बदल करण्याचा अधिकार मा. व्यवस्थापकीय संचालक, महाज्योती मुख्य कार्यालय, नागपुर यांचा असेल.

स्वा

(प्रशांत वावगे)
**व्यवस्थापकीय संचालक,**
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाज्योती, नागपूर.